“ अच्यूत गोडबोले यांच्या साहित्याचा शैक्षणिक दृष्टीकोणातून विश्लेषणात्मक अभ्यास ”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पी.एच.डी. शिक्षणशास्त्र पदवीसाठी सादर करावयाचा

संशोधन आराखडा

संशोधक

कुमठेकर राधेशाम नंदकिशोर

(एम.ए.एम.एड्.)

मार्गदर्शक

डॉ.गोरोबा तुकाराम खुरपे

(एम.एस्सी.(गणित), एम.एड्., एम.फिल., पीएच.डी.(गणित,शिक्षणशास्त्र))

प्राचार्य

मानवेंद्र केंद्रे अध्यापक महाविद्यालय, जळकोट. जि. लातूर

अभ्यासकेंद्र

शिक्षणशास्त्र संकूल , स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जि. नांदेड (महाराट्र राज्य)

" अच्यूत गोडबोले यांच्या साहित्याचा शैक्षणिक दृष्टीकोणातून विश्लेषणात्मक अभ्यास "

१.१ प्रस्तावना :- सध्याचे २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे व अती जलद बदलत जाणारे आहे. या सर्व बदलाचा शिक्षण क्षेत्रावर देखील मोठ्या प्रमाणात परिणाम झाल्याचे आपणास पहावयास मिळते. तरीही या काळात पुस्तके आपलं स्थान टिकवून आहेत.

समाजाच्या जडण-घडणीत साहित्य निर्मितीचा मोठ्या प्रमाणात परिणाम होत असतो व पर्यायाने त्याचे परिणाम शिक्षणावर देखील होत असतो. उत्कृष्ट साहित्यातून एका उत्कृष्ट समाज निर्मिती होण्यास मदत होत असते व या साहित्याचा परिणाम शिक्षण क्षेत्रावर देखील होत असतो.

अशा या एका चतुरस्त्र लेखक श्री अच्युत गोडबोले यांनी विज्ञान, गणित, संगणक, तंत्रज्ञान, तत्वज्ञान, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, व्यवस्थापन, साहित्य, संगीत आणि चित्रकला या सर्व क्षेत्रामध्ये त्यांनी भरपूर लिखाण केले आहे. श्री अच्यूत गोडबोले यांनी 'संगणकयुग', 'नादवेध', 'किमयागार', 'अर्थात', 'गुलाम', 'नॅनोदय', 'थैमान चंगळवादाचे', 'मुसाफीर', 'गणिती', 'कॅनव्हास', 'लाईमलाईट', 'मनकल्लोळ' अशा अनेक पुस्तकाचे लेखन केले आहे. 'नादवेध', 'किमयागार', 'अर्थात', 'नॅनोदय' आणि 'मनात' या पुस्तकांना राज्यशासनासह अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आहेत.

श्री अच्यूत गोडबोले यांनी आपल्या साहित्यातून तत्वज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, गणित, विज्ञान, संगणक, संगित, चित्रकला या शैक्षणिक क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात लिखान केले आहे. प्रस्तुत संशोधनात यावर शैक्षणिकदृट्या प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

१.२ संशोधन समस्या विधान :-

" अच्यूत गोडबोले यांच्या साहित्याचा शैक्षणिक दृष्टीकोणातून विश्लेषणात्मक अभ्यास "

१.३ संशोधनाची गरज :-

श्री अच्यूत गोडबोले यांनी आपल्या साहित्यात मोठ्या प्रमाणात विविध शैक्षणिक विषयावर भर दिलेला आपणास पहावयास मिळतो. त्या दृष्टीकोनातून त्यांच्या साहित्यावर शैक्षणिक दृष्ट्या प्रकाश टाकून साहित्याचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

१.४ संशोधनाचे महत्व :-

१. प्रस्तुत संशोधन हे अच्यूत गोडबोले यांच्या साहित्याकडे पाहण्याची एक विशिष्ट प्रकारची दृष्टी देईल की जी दृष्टी अध्ययन – अध्यापनास उपयुक्त ठरेल.

२. श्री अच्यूत गोडबोले यांच्या साहित्यातून नक्की कोणकोणती उदिष्टे सफल होतात व त्या दृष्टीने श्री अच्युत गोडबोले यांच्या साहित्याचे शैक्षणिक दृष्ट्या मूल्य कोणते हे ठरवता येईल.

३.शैक्षणिक क्षेत्रात साहित्याचे अध्यापन करतांना शिक्षकाला, शैक्षणिक मूल्यसमापन करण्यासाठी काही नवीन नियम सापडतील.

४. हे संशोधन लेखकाच्या साहित्याचा शैक्षणिक दृष्टीकोणातून चिकित्सक अभ्यास कसा करावा म्हणून प्रस्तूत संशोधन उपयोगी पडणार आहे.

१.५ कार्यात्मक व्याख्या :-

१. चिकित्सक –

Dictionary of Education मध्ये Carter V. Good यांनी चिकित्सक याचा अर्थ् इंग्रजीमध्ये खालील प्रमाणे दिला आहे.

"The term critical study implies the pursuit of some branCh of knowledge. A critical study of the subject. This indicates that the study is of a skillful and decisive nature. It is a meaningful injury"

चिकित्सक या शब्दाचा "परिपूर्ण असा केलेला विचार" असा अर्थ संशाधकास अभिप्रेत आहे.

२. अभ्यास –

" एखाद्या विषयाचे चिंतन, मनन व पठन करणे म्हणजे अभ्यास होय".

भाटवडेकर मो. वि. राजहंस व्यवहारिक मराठी शब्दकोश प्र.क्र.३९

१.६ संशोधनाची उदिष्टये :-

१. अच्यूत गोडबोले यांच्या साहित्याचा शैक्षणिक तत्वज्ञानाचा दृष्टीकोणातून अभ्यास करणे.

२. अच्यूत गोडबोले यांच्या साहित्याचा शैक्षणिक मानसशास्त्राच्या दृष्टीकोणातून अभ्यास करणे.

३. अच्यूत गोडबोले यांच्या साहित्याचा शैक्षणिक समाजशास्त्राच्या दृष्टिकोणातून अभ्यास करणे.

४. विशिष्ट निकष तयार करुन लेखकाच्या अभिव्यक्ती सौंदर्याचा शोध घेणे.

५. अच्यूत गोडबोले यांच्या साहित्यात आढळणाऱ्या इतर विचारांचा शोध घेणे.

१.७ संशोधनाची गृहितके :-

१. अच्यूत गोडबोले यांनी शिक्षणासंदर्भात मोठया प्रमाणात लिखान केले आहे.

२. अच्यूत गोडबोले यांच्या साहित्याचा शैक्षणिक दृष्टिकोणातून अभ्यास केल्यास त्याचा फायदा शिक्षण क्षेत्रास होईल.

१.८ संशोधनाची व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन हे अच्यूत गोडबोले यांच्या मराठी भाषेतील साहित्यापुरते मर्यादित असून त्यांच्या प्रामुख्याने शैक्षणिक दृष्टया महत्वाच्या साहित्याचाच विचार केला आहे.

१.९ संशोधनाची मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन अच्यूत गोडबोले यांनी लिहिलेल्या शैक्षणिक साहित्यापुरतेच मर्यादित आहे. शैक्षणिक दृष्टीकोणातून अभ्यासामध्ये शैक्षणिक मानसशास्त्र, शैक्षणिक तत्वज्ञान, शैक्षणिक समाजशास्त्र या दृष्टीने प्रस्तुत लेखकाच्या साहित्याचा अभ्यास केलेला आहे.

१.१० संशोधन कार्यपध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी ग्रंथालयीन अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे लागेल. तसेच संशोधनासाठी चिकित्सात्मक व विश्लेषणात्मक अभ्यास करावा लागेल. प्रस्तुत संशोधनात संशोधण पध्दतीचा वापर करतांना सर्वेक्षण पध्दती व ऐतिहासिक पध्दती या दोन्ही पध्दतीचा संयुक्तरित्या वापर केला आहे.

सर्वेक्षण पध्दतीमध्ये अच्यूत गोडबोले यांच्या साहित्याचे अभ्यासक, शिक्षण तज्ञ, समिक्षक, वाचक यांचे अच्यूत गोडबोले यांच्या साहित्याविषयी विचार किंवा मते आजमावण्यासाठी संशोधकाने प्रश्नावली व मुलाखत पध्दतीचा वापर केला आहे. तसेच अच्यूत गोडबोले यांचे प्रत्यक्ष मुलाखात घेवून माहिती साहित्याविषयी अधिक माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

१.११ प्रत्यक्ष संशोधनाची कार्यवाही :-

प्रकरण योजना :-

प्रकरण पहिले – प्रस्तावना

प्रकरण दूसरे – संबंधीत साहित्याचा आढावा,

प्रकरण तिसरे – जीवन परिचय

प्रकरण चौथे – संशोधनाची कार्यपध्दती.

प्रकरण पाचवे – संशोधन सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण सहावे – संशोधन अहवालाचा सारांश, निष्कर्ष

१.१२ संदर्भ ग्रंथसूची :-

१. डॉ. भिंताडे वि.रा. २००६ शैक्षणिक संशोधन पध्दती पूणे, नित्य नुतन प्रकाशन.

२. डॉ. जगताप ह.ना. शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने, नित्य नूतन प्रकाशन, पूणे.

३. मुळे रा.श., उमाटे वि.तु. (१९९८), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे महाराष्ट्र विदयापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.

४. देशपांडे प्रकाश (१९९५) संशोधन पध्दती एम.ए. पदव्युतर पदवी अभ्यासक्रम नाशिक.

५. पंण्डीत बन्सी बिहारी (२००७) शिक्षणातील संशोधन, (संख्यात्मक व गुणात्मक) नित्य नूतन प्रकाशन, पूणे.

संशोधक

कुमठेकर राधेशाम नंदकिशोर

(एम.ए.एम.एड)

मार्गदर्शक

डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे

(एम.एस्सी., एम.एड्., एम.फिल., पीएच.डी.)

प्राचार्य मानवेंद्र केंद्रे अध्यापक महाविद्यालय,

जळकोट, जि.लातूर